९८२६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय नाटक
क्र. नं. ८८१
८८१

# …व ढब्बू.

## पांच अंकी चित्रपट.

लेखक व प्रकाशकः
**कृ. वि. करंदीकर**, वकील.
सोलापूर गो. पेठ, घर नं. ४०.

मुद्रकः—
**अनंत विनायक पटवर्धन.**
'आर्यभूषण' प्रेस, पुणें.

किंमत तीन आणे.

१९२६.

अनु २२१

# अर्पण व प्रस्तावना.

लोकरंजननिष्णात विदूषक खरोखरी.
' प्रचंडराव ढब्बू ' हा अर्पितों ग्रंथ त्यास मी.

चुकीच्या समजुतीनें वेडावलेल्या एका लठ्ठ मनुष्याची योग्य सुधारणा झाली हा विषय या चित्रपटांत आहे.

सोलापूर
नागपचमी
शके १८४८

कृ. वि. करंदीकर.

र. ५३०९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३०६९

# प्रचंडराव ढब्बू.

## नांदी व नमन

नाट्यकर्ता नरश्रेष्ठो महानाट्यविशारदः
पातु वो भगवान्देवः शंकरः परमेश्वरः ॥

सूत्र०:– ( नांदी म्हणून नमन करीत ) प्रथमारंभीं लंबोदर, सकलसिद्धींचा दातार, चतुर्भुज परशुधर, न कळे पार वर्णिता; तो देव नटला गौरीबाळ, पायीं बांधोनि घागऱ्याघोळ, नादर तुंबर सहित मेळ सुटला पळ विघ्नासी; नटारंभीं थाटियला रंग, भुजा नाचवी हालवी आंग, सिंदूरविलेपनें चांग, मुगुटीं नाग मिरविला; सकल सिद्धींचा दातार, जयाच्या रूपा नाहीं पार, तुका म्हणे आमुचा दातार भवसागर तारील हा. (श्रीगणेश गणासह खालीं उतरून नृत्य व गायन करतो. हें काहीं वेळ चालतें )

श्रीग०:– भक्ता तुझें कल्याण असो; तुझे मनोरथ परिपूर्ण होवोत. ( श्रीगणेश गणासह वर जातो. )

सूत्र०:–आतां श्रीशारदेचं स्तवन करण्याकरतां–(नटी येते. )

**नटीः**— मी शारदेचं स्तवन करतें. आतां नमूं श्रीसरसिजोद्भवकुमारी, जी कां विलसे कविजिव्हाग्रीं, जिच्या वरदें मूकहि करी, वाचस्पतीशीं विवाद; जी आनंद-सरोवरमराळिका, जी चातुर्यचंपककळिका, जिच्या कृपेची करूनि नौका, कविबाळका नेत पैलतिरा; अंबे तूं कविहृदयाब्जभ्रमरी, कां निजानंदसागरींची लहरी, वाग्वल्ली तूं बैसे जिव्हाग्रीं, विरूढे सकळ सर्वदा; तुझिया कृपें विरंचीकुमरी, जन्मांध होती महाजोहारी, अतिमूढ तो वेदार्थ करी, शक्रपदीं बैसे रंक; रंभा उर्वशी तिलोत्तमा, सावित्री आणि मुख्य रमा, तुझ्या चातुर्यसमुद्राची सीमा, त्या हि कदा न पावती. ( श्रीसरस्वती मैत्रिणीसह खालीं उतरून नृत्य व गायन करते. हें कांहीं वेळ चाललें. )

**श्रीसर०ः**— तुमचें कल्याण असो; तुमचे मनोरथ परिपूर्ण होवोत. ( ती मैत्रिणीसह वर जाते. वरून खालीं पुष्पवृष्टि होते, विदूषक व बाळ येतात. )

**बाळः**— ( हांसत ) बाबा बाबा, आई आई, आपले हे विचित्रकाका आज असे लठ्ठ कां झाले आहेत ?

**सूत्र०ः**— ( हांसून ) आंगरख्यावर आंगरखे चढवून ते प्रचंडराव ढब्बू बनले आहेत !

विदू०:– ( नाचत नाचत) मला शिष्ट बनवा; कारण मी लठ्ठ असून लक्षाधीश आहें.

सूत्र०:– छे छे मित्रा, ही तुझी समजूत चुकीची आहे. शिक्षण आणि शहाणपण हीं मिळविलींस तर तुं शिष्ट बनशील.

विदू०:– तो प्रचंडराय ढब्बू शिष्ट बनला कां हो ?

सूत्र०:– हो हो.

बाळ०:– प्रचंडराव ढब्बू कुठं आहे ?

विदू:– ( बाळास खांद्यावर घेऊन नाचत ) तो पाहिलास कां विशालपूरचा प्रचंडराव ढब्बू ?

बाळ:– ( निरखीत ) वाहवारे वाहवा, काय गम्मत आहे ! ( सर्व पाहत पाहत व हांसत हांसत जातात )

---

# अंक १ ला.

## प्रवेश १ ला.

स्थळ:– शर्करानंदाचें घर. तो हांसत जांभळ्या देत, डोळे मिचकावीत इकडे तिकडे फिरत आहे.

शर्क०:– (स्वगत) हा समजुतीचा घोंटाळा कां ही घोटाळ्याची समजूत ? मागल्या जन्मीं मी नंदीबैल

होतों कां नंदीबैल मी होता ? कसंहि असलं तरी नाग-रिक शिष्टमंडळाचा सभासद होण्याला मी योग्य आहेंच. (विचारांत) कुठल्याशा पुराणांत, कोणच्याशा परमेश्वराच्या, कित्येकशा विभूती सांगितल्या आहेत; पण माझी मीं एकच विभूति निवडून पसंत केली आहे. ही विभूति म्हणजे विशाल नंदीबैळ. या विभूतिचिन्हा-वरून चटकन् माझी ओळख पटते. नागरिक शिष्टमंडळांत शिरण्याला पाण्यासारखा पैका खर्च झाला तरी बेहत्तर, ( मोहोरांच्या थैल्या भराभर ओतून मोहोरांचा ढीग करतो व थैल्या फेकून देतो ) अन् वाटेल त्याची पाय-धरणी करावी लागली तरी हरकत नाहीं. ( कुत्रें येतें, त्यास कुरवाळून व त्याचे पाय डोकीस लावून ) मोत्या, तुझी कांति किती शुभ्र आहेरे ! ( गोंजारून सोडून देतो, तें जातें ) भगीरथ प्रयत्न केला पाहिजे. भगीरथ म्हणून काय होतं बरं ? रथाचं चाक किंवा चाकाचा रथ असं कांहींतरी होतं खरं, अन् भागीरथी ही एक गाडी असावी. मला ती गोष्ट नीटशी आठवत नाहीं, पण एवढं खरं कीं ज्यारीची खटपट म्हणजे भगीरथ प्रयत्न. ( विचारांत ) मला अक्षराची ओळख नाहीं अन् हिशे-बाचा गंध नाहीं—नसला तर नसला. आमच्यासारख्या

भाग्यशाली प्राण्यांना अक्षर अन् हिशेब करायचे काय ? आकाशांत एक शनेश्वर तर पृथ्वीवर ही शनेश्वरांची जोडी ! बरूचा बाण काळकूट विषांत बुडवून खडर्चा-वर वार केला कीं तें अक्षर ! खडर्चाच्या लढाईत सगळे खडे खर्ची पडले असते तर ही अक्षराची ब्याद मागं राहती ना. हिशेब म्हणजे कोरडी किरकिर. एका पैशाला दोन आंबे तर चार पैशांचे किती ! आंबे बाजारांत पैसे घरांत अन् किरकिर शाळेंत ! मी या अक्षर-हिशेबांच्या तडाक्यातून निसटलों बुवा. आपला देवघेवीचा धंदा ठीक. जांभया द्यायच्या आन् झोप घ्यायची. जांभयांनीं श्वासनळी साफ होते तर झोपेनं फुफ्फुसं फैलावतात. ह्या देवघेवींत मला या प्रचंड देहाची प्राप्ति झाली ! आतां एकदां शिष्ट बनलों म्हणजे जन्माचं सार्थक झालं बुवा ! जो तो मला लवून नमस्कार करील. पण मी ज्याला त्याला अशा लाथा मारीन, ( तसें करतो त्यामुळें मेज अंगावर पडतें व त्यावरील कांहीं वस्तु अस्ताव्यस्त पडतात व कांहीं तशा पडून फुटतात; तोल जाऊन तो पडतो व आंग चोळीत उठतो ) माझ्या लाथांनीं मीच चीत झालों. असूं दे. आतां नागरिकशिष्टमंडळाची रचना करून त्यांत माझी कशी शोभा होईल त्याचा

आगाऊ अनुभव घेऊन पाहतों. (मध्यें मेज ठेवून भोव-ताली शिष्टांचीं आसनें मांडून त्यावर मुखवटे ठेवतो व स्वतः मेजावर उभा राहतो. तोल जाऊन पडतो, त्याच्या आंगावर मेज, मुखवटे व आसनें पडतात. त्यामुळें त्यास इजा होते. आवाज झाल्यामुळें बायको, मुलें व आई घाबरून धांवत येतात व त्यास धरून नेतात. पडदा पडतो.)

---

## प्रवेश २ रा.

स्थळः– शर्करानंदाचें घर–तो हातापायास व कपाळास पट्ट्या बांधून पलंगावर पडला आहे व कष्टानें पट्ट्या ठाकठीक करीत आहे. काहीं वेळानें आई दृष्टीचें सामान घेऊन येते.

आईः– तुला वरचेवर दृष्ट होते, काय करावं? आता मात्र खास व्हायची नाहीं.

शर्क०:– कशावरून?

आईः– मी आज दृष्टींत सतरा मिरच्या अन् अठरा बिब्बे घातले आहेत. (दृष्ट काढीत जांभया देत) काय जबर दृष्ट ही! सारख्या एकावर एक किती जांभया! (दृष्ट आंत नेऊन चुलींत टाकते, आरती घेऊन येते व

ओवाळते, तो जवळील झांज घेऊन वाजवितो, कांहीं वेळानें दोघांस खाटामुळें ठसका लागतो, त्या धांदलींत आरती छतास लागून आगीचा भडका होतो, दोघांचीं आंगें पोळतात, दोघं धडपडत ओरडतात, बायको व पोरें घाबरून धांवत येतात व त्यांस धरून आत नेतात, तसें करण्यांत सर्वांची धांदल उडते, पडदा पडतो. )

---

## प्रवेश ३ रा.

स्थळः— शर्करानंदाचें घर, तो चित्रकार व चरित्रकार बोलत बसले आहेत.

शर्क०:— मी नागरिकशिष्टमंडळांत प्रवेश करणार आहें. अन् त्याकरतां माझ्या अनेक खटपटी चालू आहेत.

चित्र०:— (मान डोलवीत) वाहवा वाहवा, ठीक ठीक.

चरित्र०:— (मान डोलवीत) बेष बेष, पसंत पसंत.

शर्क०:— त्यांतच मला माझ्या विभूतिचिन्हयुक्त चित्राची व गुणप्रशंसायुक्त चरित्रांची जरूरी आहे. उद्यां संध्याकाळपर्यंत एक हजार चित्रं अन् एक हजार चरित्रं तयार झालीं पाहिजेत. काय खर्च येईल बोला.

दोघे:– दोनशें मोहोरा.

शर्क०:– ह्या द्या दोनशें मोहोरा. (तसें करून) काम मात्र असं झकास करा कीं वावटळीनं धूळ जशी चहों-कडं पसरते तशी माझी कीर्ति चहोकडं पसरावी.

दोघे:– अर्थात्.

शर्क०:– माझं ह्मणणं तुम्हाला पटलं याबद्दल मी तुमचं अभिनंदन करतों.

चित्र०:–चित्रांचे मुख्य दोन प्रकार आहेत. मुंडेछाट चित्र अन् नखशिखांत चित्रं. आपल्याला कोणत्या प्रका-रचीं पाहिजेत ?

शर्क०:– आम्हाला दोन्ही प्रकारचीं चित्रं हवींत. पण मी काहीं सूचना करतों त्या मात्र अवश्य लक्षांत ठेवा. माझं नाक नकटं आहे खरं, परंतु चित्रांत तें सरळ येऊन दे. माझे डोळे पिचके आहेत खरे, परंतु चित्रांत ते कमलपत्राप्रमाणं शोभिवंत दिसावेत. माझी मुद्रा बावळट आहे खरी; परंतु चित्रांत ती चलाख चमकवा. माझं विभूति-चिन्ह नंदीबैल आहे बरं कां, त्याचं विशाल अन् मनो-हर चित्र माझ्या चित्रासमोर काढा.

चित्र०:– ठीक आहे.

शर्क०:– चरित्रकार, माझ्या चरित्राचे तीन अध्याय लिहायचे. प्रत्येक अध्यायांत माझ्या तेजस्वी भाग्याचा लखलखीत प्रकाश पाडा. मुंजीच्या दिवशीं वारसहक्कानं धनप्राप्ति हा पहिल्या अध्यायाचा मुख्य विषय; देवघेवीचा व्यापार हें दुसऱ्या अध्यायाचं मुख्य धोरण अन् तिसऱ्या अध्यायांत याचीच कांहीं तरी लांबलचक री ओढून सर्व चरित्राची इतिश्री करायची. या माझ्या साध्या कल्पनेंत तुम्ही आपल्या तरतरीत बुद्धीनं कांहीं खमंग चुटक्याची भर घालून माझ्या चरित्राचा चांगला चटकदार चिवडा बनवा.

चरित्र०:– निःसंशय. (परस्पर नमस्कार होऊन सर्व उठून पायऱ्या उतरूं लागतात; शर्करानंदाच्या आडखळण्यानें सर्व पडतात; त्याच्या ओझ्यानें चित्रकार व चरित्रकार चेंगरतात; त्यांच्या थैल्यांतून रक्कम खालीं पडते. तिघेहि कष्टानें उठून ती थैल्यात भरतात. रस्त्यावर लोक जमतात व हांसतात. शर्करानंद लंगडत लंगडत पायऱ्याना धरून वर जातो. बाकी दोघे रस्त्यावरून थैल्या घेऊन कष्टानें चालत जातात. पडदा पडतो.)

---

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

स्थळ:— शर्करानंदाचें घर. फळफळावळ व मिठाई थाटानें मांडून ठेवली आहे; बाजूस उंसाच्या रसाचा हाडा भरून ठेवलेला आहे; काहीं वेळानें निरनिराळ्या रंगाचे चार बोके येऊन मिठाई खातात; इतक्यात शर्करानंद, अलबतराव गलबतराव गोमाजी व तिमाजी येतात.

शर्क०:— अरेरे, या बोक्यांनीं फन्ना उडिवलाना; यांना खायला घालून उपयोग काय ? ( बोक्याना मारून घालवितो ) बसा, सर्व मंडळी बसा. ( सर्व तसें करतात ) हे मथुरेचे पेढे घ्या. ( सर्वांस देतो व आपण खातो. )

अल०:— अलबत उत्तम उत्तम. खवा खमंग अन् साखर थोडी. ( सर्व यथेच्छ खातात. )

शर्क०:— हीं मस्कती डाळिंबं पाहिलींत कां ? ( सर्वांस देतो व आपण खातो. )

अल०:— अलबत छान छान. माणकांचे दाणे आहेत बुवा ! ( सर्व यथेच्छ खातात. )

3069

शर्क०:– हीं वसईचीं केळीं. (सर्वांस देतो व आपण खातो )

अल०:– अलबत याचं नांव केळीं. पहिल्या प्रतीचीं रुचकर ! ( सर्व यथेच्छ खातात. )

शर्क०:– हीं नागपूरचीं संत्रीं. ( सर्वांस देतो व आपण खातो )

अल०:– अलबत मधुर अन् रसरशीत, अस्सल जातिवंत संत्रीं.( सर्व यथेच्छ खातात. )

शर्क०:– या उंसाच्या रसाची गोडी तर बघा. ( सर्वांस पेले भरून देतो व आपण एक घेतो. सर्व पितात ) हा निपाणीच्या उंसाचा रस.

अल०:– अलबत, प्रत्यक्ष अमृत आहे. निपाणीला प्रथम उंसाचं बीं स्वर्गातल्या अमरावतीहून आणलेलं आहे. (सर्व यथेच्छ पितात).

शर्क०:– सावकाश अन् यथेच्छ चालून दे.

अल०:– अलबत, तस्संच चाललं आहे. (सर्वजण सर्व जिनसांचा फन्ना उडावितात; नंतर नाचतात, बागडतात, हात धुतात, ढेकरा देतात, पोटावरून हात फिरवितात,

बसतात व पान तंबाकू खातात व धूम्रपानाचे लोटच्या लोट तोंडातून सोडतात. )

शर्क०:— आजचा हा बेत कसा काय झाला ?

अल०:— अलबत खासा झाला. तुमच्या या कर्तव्य-दक्षतेबद्दल आम्ही तुम्हांला अलबत शंभर प्रशंसापत्रं मिळवून देतों म्हणजे शिष्टपद अलबत तुमच्या हस्त-गत होईल. फक्त शंभर मोहोरा मात्र अलबत द्या.

शर्क०:— मग बहार उडेल बुवा. ह्या घ्या शंभर मोहोरा. (त्यास देतो).

तिघे:— निःसंशय बहार.

अल०:- अलबत बहार तर उडेलच उडेल; पण आपण शिष्ट बनल्याबद्दल सर्व नगरवासीयांतर्फे आपल्याला मानपत्र देऊन आम्ही आपल्या वैभवाचा अलबत कळस करूं.

शर्क०:— (आनंदानें) तुमच्या या भावी सप्रेम कृती-बद्दल मी आतांच तुम्हाला नवे पोषाख अर्पण करतों.

अल०:— अलबत स्तुत्य, अलबत योग्य. (चौघे नव्या पोषाखानें सजतात, नाचतात, बागडतात, टाळ्याचा गजर करून आनंद प्रदर्शित करतात. )

चौघे:-(मोठ्यानें) शर्करानंद गोडाजी खडीसाखरे भावी शिष्ट की जय (अशा जयघोषानें शर्करानंदाच्या हातास धरून त्यास घेऊन जातात. पडदा पडतो. )

---

## प्रवेश २ रा.

स्थळ:- शर्करानंदाचें घर, तो व धुरंधर बोलत बसले आहेत.

धुरं०:- शर्करानंद, तुम्हाला माझी एक विनंतिआ हे.

शर्क०:- काय विनंति आहे ?

धुरं०:- तुम्ही नागारिकशिष्टमंडळांत शिरण्याची खटपट करूं नये. ( अलबतराव वगैरे चौघे येऊन बसतात )

अल०:- कां करूं नये, अलबत करावी.

धुरं०:- शिष्ट होणाराच्या आंगीं अनेक गुण असावे लागतात.

अल०:- अलबत, शर्करानंदांत अनेक गुण आहेत.

धुरं०:- त्यांना लिहितां वाचतां सुद्धां येत नाहीं.

अल०:- अलबत येत नाहीं. लिहितां वाचतां येणं हा कांहीं गुण नव्हे. हें एक अलबत पोट भरण्याच्या अनेक साधनांपैकीं साधन आहे असं मानण्यांत येतं. तुमची

समजूत तशीच असली अन् तुम्ही भिकारी असलां तर अलबत लिहिणं वाचणं शिका म्हणजे फुकट उपाशीं मरण्याच्या तावडींतून कदाचित् सुटला तर सुटाल.

धुरं०:– तुम्ही माझी काळजी करूं नका. सर्व नागरिकांच्या हिताची गोष्ट लक्षात आणा.

अल०:– आम्ही अलबत तुमची काळजी करीत नाहीं. आम्ही अलबत सर्व नागरिकांच्या हिताची गोष्ट लक्षांत आणतों.

धुरं०:– मी एक नागरिक या नात्यानें बोलतों, त्याची क्षमा करा.

अल०:– आम्ही नागरिक या नात्यानेंच अलबत बोलतों. तुम्हाला एकवार क्षमा केली आहे. आमच्या शर्करानंदाचा पुन्हां असा उपमर्द कराल तर अलबत पस्तावाल, बघा पस्तावाल. शर्करानंद अलबत शिष्ट बनणारच, अन् मग त्यांच्या त्या विजयाबद्दल आम्ही त्यांना त्यांच्या योग्यतेनुरूप अलबत कांचनकरंडकांतून मानपत्र समर्पण करणार आहोंत.

शर्क०:– शाबास, अलबतराव शाबास; तुमचं म्हणणं योग्य आहे. कांचनकरंडकाला सोनं किती लागेल ?

अल०:– आपल्या नांवारूपाला शोभण्यासारखं म्हणजे

अलबत शंभर तोळे सोनं पाहिजे. पंचवीस पंचवीस तोळ्यांच्या चार चिपा द्याच.

शर्क०:— एवढंच ना ? ह्या घ्या चार चिपा, शंभर तोळे सोनं.

( अलबतराव चिपा घेऊन खिशांत टाकतो. )

धुरं०:— हा काय मूर्खपणा शर्करानंद, संपत्तीचा असा अपव्यय करूं नका.

अल०:-- अहो धुरंधर, अलबत तोंड आटपून बोला.

तिघे:— याचा चांगला खमंग समाचार घेतला पाहिजे.

अल०:-- आम्ही अलबत सत्कार्य करीत असतांना त्यांत विघ्न उत्पन्न करणाऱ्या या दुष्ट प्राण्याला फांसावर लटकविला पाहिजे.

तिघे:-- या रिकामटेकडयाला दुसऱ्याच्या उठाठेवी हव्यात कशाला ?

शर्क०:— धुरंधर, तुम्ही चालते व्हा नाहींतर बघा मग.

धुरं०:— (स्वगत) चाण्डाळचौकडीनं बिचाऱ्याला घेरलं आहे. इथं उपदेश रुचणार कसा ? ( उघड ) मी आपली रजा घेतों. ( जातो.)

तिघे:— भागुबाई कशी भ्याली.

अल०:– अलबत भ्यालीच पाहिजे. ( सर्व आनंदानें टाळ्यांचा गजर करतात, पडदा पडतो. )

---

## प्रवेश ३ रा.

स्थळः– अलबतरावाचें घर, तो सोन्याच्या चार चिपा हातांत घेऊन खुळखुळत आहे, जमिनीवर टाकीत आहे, पुन्हा हातांत घेऊन आनंद पावत आहे.

अल०:– (स्वगत) हा डाव अलबत छान साधला. परवाचा तर पचनीं पडलाच आहे.

पडद्यांत– अलबतराव आहेत कां ?

अल०:– ( गोंधळून स्वगत ) सर्व करामत अलबत माझी अन् या चोरांना काय द्यायचं आहे ?

पडद्यांत– अलबतराव, अहो अलबतराव.

अल०:– आलों आलों, दम धरा. ( झटपट चिपा पेटींत ठेवून जातो व पुन्हा तिघांस घेऊन येतो. सर्व बसतात. )

तिघे:– आमच्या तीन चिपा अन् पाऊणशें मोहरा द्या.

अल०:– ( स्वगत ) युक्ति केल्याशिवाय ही पिडा

अलबत टळणार नाहीं. (जातो व हात झाडीत तळमळत येतो व नाचूं लागतो. उघड ) हाय हाय काय वेदना ह्या ! देवा देवा, कसं करूं ( गडबडा जमिनीवर लोळूं लागतो. )

तिघे:– चुचुचु, अरेरे, काय झालं ?–( बाजूस ढोंग म्हणून कुजबुजतात.)

अल०:– अलबत हा विंचू आहे. तुम्ही आतां माझ्या भेटीची अलबत आशा धरूं नका. ( ओकसाबोकशीं रडतो. बायका पोरें जमतात. सर्व धांदल उडते, पडदा पडतो. )

---

## अंक २ रा.

### प्रवेश १ ला.

स्थळ:– शर्करानंदाचें घर, आंगणांतील मंडप, पोळ्याचा उत्सव. एक मोठा मातीचा बैल सजविला आहे. भोंवतीं आरास केलेली असून ठिकठिकाणीं चित्रकारानें दिलेलीं चित्रें टांगण्यांत आलीं आहेत. मुलींनीं फेर धरला आहे.

मुली:– (कधिं करिती लग्न माझें या चालीवर.)

दिससी तूं योग्य मोठा सकलांना पावसी ॥ध्रु०॥ कुणि तुला गंध चार्चिती, पुष्प वाहती, दीप दाविती, लख्ख तुजपाशीं ॥१॥ सकलांना पावसी, ॥ कुणि तुला खाउ घालिती, पाणी पाजिती, लांब मिरविती, सणाच्या दीशीं ॥२॥ सकलांना पावसी. ॥ कुणि तुझें शिंग ओढिती, पाय उचलिती, झूल हलविती, चक्क बहु खाशी ॥३॥ सकलांना पावसी. ॥

( कसा करिल भवपार हरि मज कसा करिल भवपार या चालीवर. )

भला दिससि सरदार, खरोखर भला दिससि सरदार ॥ध्रु०॥

शोभति तुजला शिंगें मोठी झूल तुझी जरतार ॥१॥
खरोखर भला दिससि सरदार.

आम्ही सर्वहि नमितों तुजला थोर तुझे उपकार ॥२॥
खरोखर भला दिससि सरदार.

नंदीबैला पाहुनि तुजला हर्ष भरे मनिं फार ॥३॥
खरोखर भला दिससि सरदार.

(मुली फेर सोडून फुगडचा, झिम्मा वगैरे खेळ खेळतात; नंतर त्याना हळदकुंकू व खिरापत मिळाल्यावर त्या जातात. पडदा पडतो.)

---

## प्रवेश २ रा.

स्थळः— शर्करानंदाचें घर. तो पुढील दाराच्या दोन्ही बाजूंस मजुरांकडून चित्रें चिकटवून घेण्याचें काम करवीत आहे व दोन्ही बाजूंस दोन डांब रोंववून त्यांवर तसलींच चित्रें चिकटवलेल्या पाट्या लाववून घेत आहे. लोक रस्त्यावर जमून पहात आहेत व हांसत आहेत.

शर्क०:— ( लोकास ) मी सांगतों त्याप्रमाणं त्रिवार जयघोष करा. शर्करानंद गोडाजी खडीसाखरे भावी-शिष्ट-विभूति चिन्ह नंदीबैल की जय.

लोकः— नंदीबैल महाराज की जय, प्रचंडराव ढब्बू महाराज की जय, ( एकजण अशा अक्षरांची पाटी शर्करानंदाच्या हातांत देतो व कांहींजण असल्या पाट्या हातांतून मिरवितात. याच नांवाचा जयघोष करण्यांत येऊन खदखद हंशा पिकतो व टाळ्यांचा गजर होतो. पडदा पडतो. )

---

## प्रवेश ३ रा.

स्थळः— शर्करानंदाचें घर. पुराणाचा थाट. चरित्रकार व्यासपीठावर बसून पुराण सांगत आहे. आसपास स्त्री-

पुरुष श्रोते ऐकण्यास बसले आहेत. बाजूस चरित्राचा ढीग व खिरापतीची दुरडी आहे.

चरि०:- नमः शर्करानंदाय, नमः गोडाजनिंदनाय, नमः खडीसाखरे आडनांवाय; शर्करानंदाला नमस्कार असो, गोडाजीनंदनाला नमस्कार असो, खडीसाखरे हे ज्यांचें आडनांव बरं काय महाराज, त्यांना नमस्कार असो. सर्व गोडीच गोडी, जेथें काळाचे ठायीं-शर्करानंद धवलकीर्ति, शर्करानंद झोंप घेती तस्मात्-शर्करानंद भव्यमूर्ति, सावधानें आयकावें-आ आ आ-सावधानें आयकावें. ( निरनिराळ्या प्रकारानें डुलत डुलत गातो. असें कांहीं वेळ झाल्यावर त्यास हारतुरा व बुक्का अर्पण करण्यांत येतो. श्रोत्यांना बुक्का लावून पुष्पगुच्छ व चरित्र देण्यांत येतें. या धांदलींत टवाळ पोरें बेटकुळ्या, कोंबडीं व बदकें तेथें सोडून देतात. तीं खिरापत खातात व इकडे तिकडे हिंडून त्रास देतात. त्यामुळें श्रोतेमंडळींत गडबड उडते. चरित्रकार व्यासपीठावरून तंबुऱ्यासह खालीं येऊं लागतो तों अडखळून तंबुऱ्यासह खालीं पडतो. तंबुरा फुटतो. त्यांच्या धक्यानें समया पडून दिवे विझतात व तेल चरित्राच्या ढिगावर आणि खिरापतीवर सांडतें. एकच गोंधळ माजतो. )

शर्क०:– ( खिन्न स्वगत ) हा काय अपशकून !

( पडदा पडतो. )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. 3069

---

# अंक ४ था.

---

## प्रवेश १ ला.

स्थळः– शर्करानंदाचें घर, तो खिन्न होऊन बसला आहे.

शर्क०:– ( स्वगत ) उद्यां प्रशंसापत्रं दाखल झालीं पाहिजेत, काय करावं ? अलबतराव नाहीं, गलबतराव, नाहीं, गोमाजी नाहीं, तिमाजी नाहीं. (गलबतराव गोमाजी व तिमाजी येतात.) वाः ! मंडळी आलीच. ( उघड आनंदानें ) या हो या; चौघांनाहि भरपूर शंभर वर्षं आयुष्य. ही आत्तांच तुमची आठवण काढली कीं तुम्ही तयार.

गल०:– ( खिन्न ) अलबतराव नाहींत.

गोमा०:– ( खिन्न ) पत्ता नाहीं, पार फरारी झाले.

तिमा०:– ( खिन्न ) विश्वासघात निव्वळ विश्वासघात.

शर्क०:– (गोंधळून) ही काय भानगड? प्रशंसापत्रं तयार आहेत ना? काचनकरंडक छान नक्षीदार झाला कां? मानपत्र नीट वठेल कीं नाहीं?

गल०:– कुठलीं प्रशंसापत्रं, कुठला काचनकरंडक अन् कुठलं मानपत्र! सगळे मनांतले मांडे.

शर्क०:– ( गोंधळून ) त्या शंभर मोहोरा–त्या चार चिपा–

गोमा०:– तें सर्व अलबतरावांनीं गट्ट केलं.

तिमा०:– त्याची आशा नको; त्यावर पाणी सोडा.

गल०:– पाणी काय म्हणून सोडा. ( रागानें ) अलबतराव मातींत गेला तर त्याला खणून वर काढूं अन् तें ओकवायला लावूं.

गोमा०:– तें सगळं पुढं होईल पण आतां उद्यांची वाट काय?

तिमा०:– मी तरी तूर्त तेंच म्हणतों.

गल०:– ( निक्षून ) शर्करानंद, तुम्ही असं करा. पुन्हां शंभर मोहोरा अन् चार चिपा आम्हांला द्या, अन् आत्तांच्या आत्तां आमच्याकडून तिन्ही कामं करून घ्या.

शक०:– ( खिन्न ) तुम्ही पुन्हां विलंब करणार नाहीं ना?

गोमा०:— आम्ही अलबतरावासारखे आहों काय ? आतांच्या आतां.

तिमा०:— उशीर कशाला, झटपट शंभर प्रशंसापत्रं काचनकरंडक अन् मानपत्र घेऊन आलोंच. तुम्ही इथंच आमची वाट पाहत बसा.

शर्क०:— बरं तर. ( शंभर मोहोरा व शंभर तोळे सोनें देतो. ) तिघे—शर्करानंदाचा जयजयकार असो. ( वेगानें जाऊं लागतात. )

शर्क०:— ( आशेनें ) थांबा थांबा, मी तुमच्याबरोबर येतों.

गल०:— नको नको, कांहीं जरूरी नाहीं. आपण स्वस्थ बसा. ( स्वगत ) गलबताला हें ओझं कशाला ? ( तिघे जातात, शर्करानंद सचिंत बसतो, कांहीं वेळानें अलबतराव येतो. )

अल०:— ( रागानें ) ते तिघे चोर इकडे आले होते ना ? कुठं गेले ? अलबत त्यांना चेचतों.

शर्क०:— काय झालं अलबतराव ?

अल०:— लुच्चे लबाड, खोडसाळ पाजी. माझ्याकडून शंभर मोहोरा अन् चार चिपा घेऊन गेले अन् आतां तोंड चुकावीत आहेत.

शर्क०:— अहो अलबतराव इतक्यात त्यांनीं पुन्हां मजकडून शंभर मोहोरा अन् शंभर तोळे सोनं मागून घेतलं अन् आतां येतो म्हणाले.

अल०:— अलबत लुटारू, अट्टल दरवडेखोर. आतां ते कसचे येतात ? त्यांनीं तुम्हालाहि फशिवलं आँ ?

शर्क०:— (आशेनें) तुम्ही उद्यांची तजवीज काय केली आहे ?

अल०:— ह्या दगलबाजांचीं हाडं मऊ केल्याशिवाय अलबत मला कांहीं सुचत नाहीं. ( अलबतराव वेगानें जातो. शर्करानंद खिन्न होऊन बसतो. पडदा पडतो. )

---

## प्रवेश २ रा.

स्थळ:— ग्रामाधिकाऱ्याची कचेरी. भोंवती अनेक नागरिक जमले आहेत. प्रशंसापत्रें दाखल करण्याचें काम झपाट्यानें चालू आहे. शर्करानंद व इतर शिष्ट होऊं इच्छिणारे इकडे तिकडे लगबगीनें हिंडत आहेत. असें कांहीं वेळ चालतें.

शिपाई:— (झंगट वाजवीत) पाव घटका राहिली. (प्रशंसापत्रें दाखल करण्याची गर्दी होते. )

शर्क०:— (खिन्न स्वगत) विलक्षण, विलक्षण, कसलं विलक्षण ! चांडाळचौकडीनं सपशेल फशिवलं. एकहि प्रशंसापत्र नाहीं, मी शिष्ट बनणार कसा ? अगोदर शिष्टच नाहीं तर मग पुढचं मानपत्र कुठलं—मेवामिठाई, कपडे, मोहोरा चिपा-सगळं कीं हो फुकट गेलं. (मूर्च्छित होऊन पडतो. लोक ताळवेस व डोळ्यास पाणी लावतात, कांहीं वेळानें अर्धवट शुद्धींत येऊन बसतो व बरळतो ) कायहो अलबतराव, तुह्माला गलबत दिसलं कां? गलबतांत कोण कोण होते ! (कान देऊन) काय म्हटलंत ? गोमाजी अन् तिमाजी होते? या या, पुन्हां चौघंहि या अन् ह्या घ्या मोहोरा अन् सोनं. (खिशांतून बाहेर मोहोरा आणि सोन्याचे तुकडे फेकतो ) आणखी हा पोषाख हवा कां ? ( कपडे काढून फेकूं लागतो. शिपाई व लोक सर्व जिनसा नीट उचलून त्यास डोलींतून घरीं पोंचवितात. )

शिपाई:—( झंगट वाजवून ) वेळ झाली, आतां बंद. (कचेरीच्या दारांत फार गर्दी जमते. पडदा पडतो )

———

## प्रवेश ३ रा.

स्थळ:— शर्करानंदाचें घर. तो आजारी अंथरुणावर

कण्हत पडला आहे. बाजूस धुरंधर बसला आहे.

शर्क०:– एकाच बचनागाचीं चार कांडकीं हो; मला ठार केलं. त्यांच्या नादाला ल्गागून मी तुमचा व्यर्थ छळ केला त्याची क्षमा करा.

धुरं०:– झालं तें जाऊं द्या, त्याबद्दल खेद करूं नका.

शर्क०:– माझं सोनं कुठं आहे हो. ( ग्रामाधिकारी कांहीं शिपायांबरोबर अलबतराव वगैरे चौघांस घेऊन येतो )

ग्रामा०:– हें पहा इथं आहे. ह्या घ्या दोनशें मोहोरा अन् हें घ्या दोनशें तोळे सोनं. परवा फेंकून दिलेला हा माल नीट ठेवा. ( तो कष्टानें सर्व माल पेटींत ठेवतो) तुम्ही या धुरंधराच्या सल्ल्यानं शिक्षण अन् शहाणपण संपादन करा म्हणजे मी तुमचं नांव नागरिक शिष्ट-मंडळांत दाखल करीन. अहो धुरंधर, यांना नीट सल्ला देऊन यांची सुधारणा करा.

धुरं०:– (नमस्कार करून) ठीक आहे.

शर्क०:– आपण थोडं बसावं. ( नमस्कार करतो. )

ग्रामा०:– (नमस्कार करून) मला आतां वेळ नाहीं याची माफी असूं दे. अलबतराव, गलबतराव आणि मंडळी चला, तुम्ही आपल्या भावी योग्य वर्तनाबद्दल

जामीन द्या. ( तो ते चौघे व शिपाई जातात. पडदा पडतो. )

---

# अंक ५ वा.

## प्रवेश १ ला.

स्थळः– शर्करानंदाचें घर. तो मोठ्या कष्टानें मांडी घालून लिहीत आहे. वरचेवर मांडी बदलतो. कांहीं वेळानें निरनिराळीं पुस्तकें वाचून टिपणें करतो. असें कांहीं वेळ चालतें.

**शर्क०**:– (स्वगत) आज एवढं बस्स. (कष्टानें उठतो, तोल संभाळीत आडखळत आडखळत जातो. पडदा पडतो. )

---

## प्रवेश २ रा.

**स्थळः**– मैदान, शर्करानंद मुलाच्या मदतीनें जोर काढीत आहे. तसें करण्यांत तो व मुलें दमतात, कांहीं वेळानें तो, धुरंधर व मुलें रस्सीखेंच, पादकंदुक वगैरे खेळ खेळतात. शर्करानंद अनेक वेळां तोल जाऊन पडतो. मुलें त्यास उठवितात, कांहीं वेळानें सर्व उंच

जाळ्यावरून उड्या मारतात. त्यांत शर्करानंदाची त्रेधा उडून तो जाळ्यांत सांपडतो. मुलें त्यास बाहेर काढतात. नंतर सर्व पाण्याच्या खड्ड्यावरून उड्या मारतात. तसें करण्यांत शर्करानंद आंत पडतो. त्यासें वर ओढण्यात बाकीचे सर्व हैराण होतात.

**मुलें:**— बजरंग बली की जय. (पडदा पडतो. ).

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ:**— मैदान, धुरंधर व शर्करानंद मुलांकडून अनेक प्रकारच्या कवायती करून घेत आहेत. कांहीं वेळ तसें झाल्यावर सर्व रांगेनें उभे राहून वाद्याच्या जयघोषांत श्रीसमर्थवचन म्हणण्यांत येतें.

**सर्व:**— देह त्यागितां कीर्ति मागें उरावी, मना सज्जना हीच क्रीया करावी, मना चंदनाचे परी त्वा झिझावें, तरी अंतरीं सज्जना नीववावें. श्रीसमर्थ रामदास महाराज की जय. (सर्व श्रीसमर्थांच्या चित्राचें निशाण पुढें ठेऊन कूच करीत जातात. पडदा पडतो. )

---

## प्रवेश ४ था.

**स्थळ:**— सभागृह, नागरिकशिष्टमंडळ बसलें आहे. त्यात शंकरानंद व धुरंधर आहेत.

ग्रामा०:—आपल्या नागरिकशिष्टमंडळांत ( बोटानें दाखवून ) हे दोन सद्गृहस्थ निवडून घेतले आहेत, त्यांना मी ह्या सनदा अर्पण करतों. ( तसें केल्यावर पानसुपारी अत्तरगुलाब देण्यांत येतो ) आजची सभा बरखास्त. ( पडदा पडतो. )

समाप्त.

# कृ. वि. करंदीकर यांचीं पुस्तकें.

सती आहिल्या ( होळकर ) सप्तांकी नाटक, कृष्णकृपा नाटक, भगीरथ, रामजन्म, प्रल्हाद, शाकुंतल, वेणीसंहार, उत्तररामचरित, कलियुगांतील परशुराम, फक्कडराव लग्ने, गोपाळकाला चित्रपट, पंचरंग, प्रसादपुष्पसुगंध, तर्क, मंगलमूर्ति मोरया.

30E9